| | | | |
|---|---|---|---|
| CNR NO.MHCH180047912018 | दाखल दिनांक | : | ०५/०७/२०१७ |
| | नोंदणी दिनांक | : | ०५/०७/२०१७ |
| | निकाल दिनांक | : | १०/०८/२०२६ |
| | **कालावधी** | : | **०९ व.०१ म. ०५ दि.** |

| | |
|---|---|
| | **कोरपना येथील न्यायदंडाधिकारी वर्ग–१, न्यायालय क्र.२ यांचे न्यायालयात**<br><br>**(पीठासीन अधिकारी – दिक्षा दिलीप सहारे)**<br><br>**–: न्यायनिर्णय –:**<br>(घोषित दिनांक १०/०८/२०२६)<br><br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१५९३/२०१८ (नविन)**<br>**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१३६४/२०१७ (जुना)**<br>**निशाणी क्र.१३ पुढे**<br><br>**गु.र.न.१२४/२०१७,पोलीस ठाणे,कोरपना,जि.चंद्रपूर**<br>**गुन्हा –** महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ कलम–६५(ई) प्रमाणे |
| **फिर्यादी** | सरकारतर्फे–पोलीस स्टेशन,कोरपना |
| **अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता** | **श्रीमती.टि.बी.नेवारे वकील मॅडम** |
| **आरोपी** | **लक्ष्मण मारोती उपरे**<br>वय ५० वर्षे, व्यवसाय–मजुरी |

| | |
|---|---|
| | रा.नारंडा, तह.कोरपना,<br>जि.चंद्रपूर. |
| **आरोपीतर्फे विधीज्ञ** | श्री.एम.एस.धामोरीकर वकील साहेब |

## भाग–ब

| | |
|---|---|
| घटना दिनांक | १६/०४/२०१७ |
| पहिली खबर दिनांक | १६/०४/२०१७ |
| अंतिम अहवाल दाखल दिनांक | ०५/०७/२०१७ |
| आरोपाचा तपशील ठेवल्याचा दिनांक | ०३/०३/२०२२ |
| पुरावा सुरू झाल्याची दिनांक | २३/११/२०२२ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक | ............ |
| न्यायनिर्णय दिनांक | १०/०८/२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | निरंक |

## आरोपीचा तपशील

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नाव | :– | लक्ष्मण मारोती उपरे |
| अटक तारीख | :– | १६/०४/२०१७ |
| आरोपी याला जामीनवर सोडल्याची तारीख | :– | १६/०४/२०१७ |
| अधिनियम | :– | महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम,१९४९ कलम–६५(ई)प्रमाणे |
| निर्दोष किंवा दोषी | :– | निर्दोष मुक्त |
| दिलेली शिक्षा | :– | निरंक |
| सुनावणी दरम्यान जेलमध्ये असल्याचा कालावधी कलम ४२८ | :– | निरंक |

| फौ.प्र.सं. | | |
|---|---|---|

# न्यायनिर्णय
## (अधिघोषित दिनांक १० ऑगस्ट २०२६)

आरोपी विरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम,१९४९ कलम–६५(ई) अन्वये अपराधाच्या आरोपासाठी सदरचा खटला चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाच्या खटल्याचा सारांश खालीलप्रमाणे:–**

२. अभियोगपक्षाने थोडक्यात असे कथन केले आहे की, दिनांक १६/०४/२०१७ रोजी पोलीसांना मुखबीरद्वारे माहिती मिळाली की, लक्ष्मण मारोती उपरे त्याच्या राहते घरी दारू विक्री करीत आहे, अशा खबरेवरून पोलीसांनी पंचांना पाचारण करून त्याच्या राहत्या घरी गेले. आरोपीला पोलीसांनी त्यांचा व पंचांचा परिचय देऊन घरझडती बाबत सांगितले. घराची झडती घेतली असता. घरातील तांदळ्याच्या कोठीत कापडी थैली लपविलेल्या १० नग देशी दारू प्रत्येकी १८० मिलीनी भरलेल्या सिलबंद शिश्या किंमत अंदाजे १०००/– रूपयांचा अवैधरित्या माल मिळून आला. त्यामुळे फिर्यादी यांनी आरोपीविरूध्द पोलीस स्टेशन कोरपना येथे कायमी रिपोर्ट दिला.

३. सदर फिर्यादवरून आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम,१९४९ कलम–६५(ई) अन्वये अपराध क्र.१२४/२०१७ नोंदविण्यात आला. श्री.रामुचंद्र लक्ष्मण पुष्पकोर,ब.न.२८००, पोलीस स्टेशन,कोरपना यांनी पंचासमक्ष घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला. तसेच तपासी अधिकारी, श्री.शंकर मनोहरलाल मोहुर्ले/१९१९ यांनी साक्षीदाराचे बयान नोंदविले. तपासाअंती आरोपीविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम,१९४९ कलम–६५(ई) अन्वये आरोपाचा तपशील निशानी क्र.१३ खाली तयार करण्यात आला. सदर आरोपाचा तपशील आरोपीला वाचुन दाखविले. आरोपीचे कबुली जबाब नोंदविण्यात आले. आरोपीला

सदर गुन्हा कबुल नसल्याचे सांगितले व खटला चालविण्याची विनंती केली. नि.क्र.०१ वरील आदेशाप्रमाणे अभियोगपक्षाचा पुढील पुरावा बंद करण्यात आला. तसेच आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ (१)(ब) अन्वये निवेदन नोंदविण्यात आले.

**५.** अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती.टि.बी.नेवारे व आरोपीचे वकील विधीज्ञ श्री.एम.एस.धामोरीकर वकील साहेब यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला.

**६.** सदर खटल्यातील उद्दभवलेले मुद्दे त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षाची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे:–

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | दिनांक १६/०४/२०१७ रोजी ०९.३० ते १०.३० वाजताच्या सुमारास मौजा–नारंडा ता.कोरपना, जि.चंद्रपूर येथे आरोपी हा त्याच्या घरात देशी दारु कंपनीच्या प्रत्येकी १८० मि.ली.च्या एकुण १० नग विक्री करण्याच्या उद्देशाने अवैधरित्या बाळगतांना मिळून आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | **नाही.** |
| **२.** | काय आदेश ? | **आरोपीला निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

**– कारणमिमांसा –**

**<u>मुद्दा क्र.१ व २ करीता :</u>**

**७.** सदर प्रकरणामध्ये आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार रामचंद्र लक्ष्मण पुष्पकोळ (फिर्यादी), रामचंद्र मारु गुरनुले(पंच), शंकर मोहुर्ले(तपासी अधिकारी) यांना तपासले.

८. अ.सा.क्र.१/ फिर्यादी यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यात असे सांगितले आहे की, ते इतर पोलीस कर्मचारी व पंच्यांसह आरोपीचा घरी नारंडा फाटा येथे छापा टाकण्याकरीता गेले होते. त्यावेळी आरोपीच्या घरातील तांदळाच्या डब्ब्यातुन १० नग १८० मिली देशी दारुच्या बॉटल मिळुन आल्या. त्यानुसार त्यांनी जप्ती पंचनामा तयार केला. तो नि.क्र.१५ आहे तसचे रासायनिक प्रयोगशाळेकरीता एक बॉटल पाठविली. सदरचा रासायनिक प्रयोगशाळेच्या फॉर्म नि.क्र.१६ वर असल्याचे सांगितले. तसेच त्यांनी आरोपीविरुध्द रिपोर्ट दिली होती. सदर रिपोर्ट ही नि.क्र.१७ वर असुन छापील प्रथम खबर अहवाल नि.क्र.१८ वर आहे.

९. अ.सा.क्र.२/ पंच यांनी त्यांच्या साक्षपुराव्यात सांगितले आहे की, ते आरोपींना ओळखतात, आरोपीचे त्यांचा गावामध्ये घर आहे. पोलीसांनी त्यांना आरोपींचा घरी पंचनाम्याकरीता बोलावले होते. पोलीसांनी त्यांना अंदाजे ३ वर्षापुर्वी बोलविले होते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष पंचनामा केला नाही किंवा काही जप्त सुध्दा केले नाही. त्यांचे फक्त पंचनाम्यामध्ये नाव लिहिले व सही घेतली. त्यांनी पंचनाम्यावरील सही मान्य केली परंतु त्यातील मजकुर माहिती नसल्याने सांगितले. सदर साक्षदार हा अभियोग पक्षास पुर्णपणे सहाय्य करीत नसल्यामुळे सदर साक्षदारास उत्तर सुचक प्रश्न विचारण्यात आले. सदर साक्षदाराने "पोलीसांनी त्यांना दिनांक १७.०४.२०१७ रोजी बोलविले होते व त्यांच्या घरातुन तांदळाच्या पोत्यातुन १० नग दारुचे बॉटल जप्त केले व पंचनाम्यावर सही घेतली" असे मान्य केले आहे.

**१०.** अ.सा.क्र.३/ तपासी अधिकारी यांनी त्यांच्या साक्षपुराव्यात असे सांगितले आहे की, रामचंद्र लक्ष्मण पुष्पकोर यांच्या फिर्याद वरुन आरोपीविरुध्द गुन्हा दाखल केला

होता. तसेच नि.क्र.१८ वर त्यांची सही असल्याचे सांगितले. सदर गुन्ह्याच्या तपास त्यांच्याकडे देण्यात आला होता, तसेच तपासादरम्यान त्यांनी आरोपीला अटक केली व साक्षदाराचे बयाण नोंदविले व तपास पुर्ण झाल्यानंतर दोषारोपपत्र दाखल केले.

**११.** अभियोग पक्षाने रासायनिक पुथ्थकरणाचा अहवाल दिनांक १६.११.२०१७ रोजी नि.क्र.११ प्रमाणे दाखल केला आहे. त्यामध्ये दारुचे प्रमाण ४२.०८% दिसुन येत आहे.

**१२.** बचाव पक्षामार्फत अ.सा.क्र.०१ ते ०३ यांच्या उलटतपास घेण्यात आला. अ.सा.क्र.०२ / पंच यांनी उलटतपासात "त्यांच्या समक्ष आरोपीचा घरातुन दारुचे बॉटल जप्त केले नाही, पोलीसांनी सांगितले म्हणुन त्यांनी फक्त कागदावर सही केली, तसेच पोलीसांनी पंचनाम्यामध्ये काय लिहीने आहे हे त्यांना माहिती नाही" असे मान्य केले आहे. सदर खटल्यात पंच साक्षदार हा मुख्य साक्षदार आहे. परंतु त्याने हे मान्य केले आहे की, त्याच्या समक्ष आरोपीच्या घरातुन जप्त केले नाही. तसेच पोलीसाच्या सांगण्यावरुन त्याने कागदावर सह्या केल्या अश्यावेळेस अ.सा.क्र.०१ ने दिलेल्या साक्षपुराव्याला दुजोरा मिळत नाही. तसेच अ.सा.क्र.०२ याने अभियोग पक्षाने विचारलेल्या उत्तर सुचक प्रश्नामध्ये हे मान्य केले आहे की, पोलीसांनी त्याच्या समक्ष आरोपीच्या घरातुन तांदळाच्या पोत्यातुन १० नग जप्त केले होते. व त्यांची पंचनाम्यावर सही घेतली होती परंतु बचावपक्षाने दिलेल्या सर्व सुचना मान्य केल्या आहे. अशावेळेस पंच साक्षदाराच्या साक्ष पुराव्यात गंभीर तफावत आढळुन येत आहे. करीता सदर साक्षदार हा विश्वास पात्र नाही.

**१३.** अभियोग पक्षाने अ.सा.क्र.०३ व्यतिरिक्त स्वतंत्र्य साक्षदार तपासलेला नाही करीता आरोपीचा घरातुन मुद्देमाल जप्त केलेला आहे हे निसंशयापलीकडे सिध्द होत नाही. अशावेळेस नि.क्र.११ खाली असलेला रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल हा अर्थहीन ठरतो.

**१४.** सदर खटल्यामध्ये फिर्यादीचा साक्षपुरावा, संशयास्पद पंचनामाच्या आधारावर आरोपीविरूध्द गुन्हा सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपीने महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम, १९४९ कलम–६५(ई) अंतर्गत गुन्हा केल्याचे सिध्द होत नाही. करीता मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देवून मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

**१.** आरोपी **लक्ष्मण मारोती उपरे** यांना महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमाच्या कलम ६५(ई) अन्वये शिक्षेस पात्र असलेल्या अपराधातून फौजदारी प्रक्रीया संहिता कलम २५५(१) नुसार दोषमुक्त करण्यात येत आहे.

**२.** जप्त मुद्देमाल योग्य त्या निर्गतीकरिता अपिल कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क, चंद्रपुर यांच्याकडे पाठविण्यात याव्यात.

**३.** आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

**४.** आरोपीने फौजदारी प्रक्रीया संहितेचे कलम ४३७–अ च्या पुर्ततेसाठी रक्कम रू.१५,०००/–चा वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा या न्यायालयात सादर करावा.

न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.

स्वा./–
**(दिक्षा दिलीप सहारे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी
(न्यायालय क्र.२), कोरपना

दिनांकः १०/०८/२०२६

## भाग–क

अभियोगपक्षातर्फे, बचावपक्षातर्फे व न्यायालयाचे साक्षीदारांची यादी

**अ.अभियोगपक्ष**

| श्रेणी | नाव | पुराव्याचे स्वरूप (प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, एक्सपर्ट साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| अ.सा.क्र. १ | रामचंद्र लक्ष्मण पुष्पकोर (निशानी क्र.१३ पुढे) | फिर्यादी |
| अ.सा.क्र. २ | रामचंद्र मारु गुरनुले (निशानी क्र.१३ पुढे) | पंच |
| अ.सा.क्र. ३ | शंकर मनोहर मोहुर्ले (निशानी क्र.१३ पुढे) | तपासी अधिकारी |

**ब.बचावपक्ष–निरंक**

**क.कोर्ट–निरंक**

<u>अभियोगपक्षातर्फे, बचावपक्षातर्फे व न्यायालयाचे निशाणीची यादी</u>

**अ.अभियोगपक्ष**

| अनु.क्र. | निशाणी क्र. | तपशील |
|---|---|---|
| **१** | १५ | घटनास्थळ जप्ती पंचनामा |
| **२** | १६ | सिए फॉर्म |
| **३** | १७ | कायमी रिपोर्ट |
| **४** | १८ | छापील प्रथम खबर अहवाल |

**ब.बचावपक्ष–निरंक**

**क.कोर्ट–**

| अनु.क्र | नि.क्र. | तपशील |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | नि.क्र.१३ पुढे | अपराधाचा तपशील |
| २. | नि.क्र.१३ पुढे | आरोपीचे निवेदन |
| ३. | नि.क्र.११ | रासायनिक पृथ्थकरणाचा अहवाल |

**मुद्देमाल यादी**

| अनु.क्र. | मुद्देमाल क्र. | तपशील |
|---|---|---|
| १. | ...... | देशी दारु कंपनीच्या प्रत्येकी १८० मि.ली.च्या एकुण १० नग. |

स्वा./–
**(दिक्षा दिलीप सहारे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(२ रे न्यायालय),कोरपना.

ठिकाण – कोरपना.
दिनांक –१०/०८/२०२६